# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्र-३५०/२०२४ दिनांक-१४/०९/२०२४.

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात "जीवन-रक्षा" प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न.

आज दिनांक १४/०९/२०२४ रोजी १६.०० वा. ते १७.३० वा. चे दरम्यान संवाद हॉल, पोलीस आयुक्त कार्यालय, मिरारोड येथे इंडियन मेडिकल असोशिएशन (आय.एम.ए.) मिरा-भाईंदर यांचे वैद्यकिय अधिकारी श्री. राजिव अग्रवाल व पियुश जिंदाल यांच्या उपस्थितीत जीवन-रक्षा कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत उपस्थित पोलीस अधिकारी, अंमलदार, रिक्षा चालक प्रशिक्षीत व्यक्ती यांनी आपतकालीन परिस्थितीत रुग्णाच्या छातीवर दाब देवुन किंवा तोंडाने श्वास देवुन त्याचा जीव कसा वाचवायचा याबाबत मार्गदर्शन केले. शास्त्रीय भाषेत याच क्रियेला Cardio Pulmonary Resuscitation (सी.पी.आर.) करुन जीव वाचविणे असे म्हणतात.

सदरची कार्यशाळा ही श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे मार्गदर्शन व संकल्पनेतुन पार पाडली. त्यावेळी त्यांनी सदर प्रशिक्षण हे संपुर्ण पोलीस आयुक्तालयात टप्या-टप्याने चालु ठेवणार असल्याचे सांगितले. या कार्यशाळेस श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), श्री. शंकर इंदलकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग, श्री. देविदास हंडोरे, पोलीस निरीक्षक, काशिमिरा वाहतुक शाखा तसेच वाहतुक शाखेतील ३५ पोलीस अधिकारी, अंमलदार, मिरा-भाईंदर परिसरातील ३० रिक्षा चालक व पत्रकार बांधव उपस्थितीत होते.







---------ooooo----------